# आर्थिक वाढ आणि सामाजिक न्याय

आर्थिक वाढीचा आग्रह

आर्थिक वाढीचे गोडवे सध्या जोरात गायिले जात आहेत. भारताच्या आर्थिक वाढीचा दर ८ टक्क्यांवरून प्रतिवर्षी १० किंवा १२ टक्क्यांवर पोहोचला की सर्वांचे भले होईल, कारण या वाढीचा काही भाग समाजातील प्रत्येकाच्या वाट्यास येऊन एकूण भारतीय समाजाचीच भरभराट होईल, असे आज आग्रहाने सांगितले जात आहे. आजच्या अर्थसंकल्पाच्या भाषणाला होणार अर्थमंत्र्यांनी हाच आशावाद व्यक्त करून केला आहे. गेली २०० वर्षे अर्थशास्त्र हीच गोष्ट पुनःपुन्हा सांगत आले आहे. मात्र उत्पादन वाढीचा प्रश्न सतत जरीत [illegible] अर्थशास्त्रात या वाढीचे फायदे समाजात सर्वत्र कसे वाटले जातील आणि समाजात विषमतेचा नव्हे तर समतेचा हातभार कसा लागेल, याचा ऊहापोह अगदीच मोघम केला जातो. सामान्यतः उत्पादन वाढीत सर्वांचेच कल्याण होईल, आपोआप या वाढीचा फायदा समाजातील प्रत्येक घटकाला मिळेल, हा आशावाद असतो.

प्रत्यक्षात हा आशावाद निष्फळ ठरतो, असे सतत दिसून आले आहे. म्हणूनच चीनने या वर्षी आर्थिक वाढीचा वेग कमी धरण्याचे ठरविले आहे; आणि या वाढीचा फायदा समाजातील सर्व थरांना कसा मिळत राहील, याकडे लक्ष देण्याचे ठरविले आहे.

व्यस्त नाते

असे का होते? सामाजिक समता प्रत्यक्षात आणायची, विषमता कमी करायची म्हणजे आर्थिक वाढीचा दर कमी का करावा लागतो? आर्थिक वाढ आणि सामाजिक समता, यांचे नाते व्यस्त का आहे?

पर्यावरणाचा विचार केला तर उत्तर असे सापडते की, आजची आर्थिक वाढ ही निसर्गातली विविधता कमी करून केली जाते. याउलट नैसर्गिक उत्क्रांती ही विविधतेला, जैविक विविधतेला, पोषक ठरते. शेतीचा वाढता प्रसार, हे याचे ठळक आणि उत्तम उदाहरण आहे. या अर्थाने शेती म्हणजे निसर्ग-नियमाविरुद्ध जाणेच होय. आजच्या धोरणातही जैविक विविधतेचा आर्थिक वाढीशी कोठेही जोडले जात नाही. आर्थिक वाढीसाठी जैवविविधता नष्ट झाली तर हरकत नाही, असेच आजचे शासकीय धोरण म्हणते. निसर्गाशी स्पर्धा करीत आर्थिक वाढ करायची, म्हणजे रास्त वाटते. निसर्गा-शी स्पर्धा करण्यातच पुरुषार्थाची ख्याती कामी येते आणि त्यातून जे उत्पादन मिळेल, त्यावर समाधान मानावे लागते. म्हणजेच जैविक विविधता कमी करून आर्थिक वाढ करणे हे स्वाभाविक ठरते.

दुसरी गोष्ट अशी की आजच्या आर्थिक वाढीमध्ये नैसर्गिक सुविधांच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष केले जाते, आणि एकीकडे आर्थिक वाढ होत असताना, नैसर्गिक सुविधा नष्ट होताना दृष्टीस पडतात. निसर्ग काही सुविधा आपल्याला मोफत उपलब्ध करून देत असतो. याचा आधुनिक समाजाला जवळजवळ विसर पडला आहे, असे म्हणावेसे वाटते. वातावरण आणि त्यात असलेले प्राण-वायूचे प्रमाण, ही निसर्गाने पुरविलेली सुविधा आहे, हे आपण विसरून जातो. आर्थिक वाढीमुळे झालेल्या प्रदूष-णामुळे हे प्रमाण कमीजास्त होते आणि आपल्या आरोग्याला धोका पोचू लागला, की या सुविधेचे महत्त्व समजते. नैसर्गिक

हवा आणि पाण्याने वाहते प्रवाह यांमध्ये स्वयं-शुद्धी करण्याची ताकद आहे. वाहत्या पाण्यात बांध घालून ते साठवून आपण ते वापरतो आणि सांडपाणी नदीत सोडतो. ते नैसर्गिकरीत्या शुद्ध होणे जवळजवळ अशक्यच असते. स्वच्छ नद्या सांडपाण्याने खराब झाल्या की स्वयंशुद्धीकरणाचे महत्त्व आपल्याला समजते.

आर्थिक वाढ

पराग

आर्थिक वाढीमुळे निसर्गाकडून या सुविधांना मोफत होणारा पुरवठा बंद पडतो. मग आपल्याला तंत्रज्ञानाचा उपयोग करून, वरील खर्च करून या सुविधा कृत्रिमरीत्या पुरविण्याची व्यवस्था करावी लागते. पाडण्या-मी खर्च वाढतो. आर्थिक वाढ एकदा सुरू झाली-की पर्यावरणाची जी हानी होते, ती कृत्रिमरीत्या, मोठा खर्च करून भरून काढणे, हेच तंत्रज्ञानाचे काम बनते. निसर्गातल्या पर्यावरणाशी कसेबसे, तंत्रज्ञानाने सहज स्थान राखून घेणे, हेच ज्ञानाची सार्थकता काम बनते.

खडकांचे नैसर्गिकरीत्या विघटन होऊन चिर-काळानी तयार झालेली माती, जमिनीच्या धुपेबरोबर आलेला गाळ, वनस्पतींनी प्रकाशसंश्लेषणाच्या साहाय्या-ने तयार केलेले अन्न, मधमाश्यांसारख्या कीटकांनी घडवून आणलेले परागसंकरण, हा एवढेच नव्हे तर निसर्गातील जैवविविधता या सर्व गोष्टी म्हणजे निस-र्गाने मानवाला मोफत पुरविलेल्या सुविधा आहेत. खरंतर आर्थिक वाढ झाली की या मोफत सुविधांना फायदा होऊन उत्पादन आणि उपभोग यांत वाढ होईल. पण असे होताना दिसत नाही. आर्थिक वाढ होताना या सुविधा नष्ट होणे आणि त्या कृत्रिमरीत्या पुरविण्यासाठी खर्च करणे, हेच नेहमी

अनुभवास येते. त्यामुळे आर्थिक वाढ महाग पडते.

सर्वसामान्यांच्या गरजा आणि आर्थिक वाढ.

सध्या महागाईचा भस्मासूर सर्वांना भेडसावीत आहे. आर्थिक वाढीची घोडदौड सुरू झाली की प्राथमिक गरजेच्या वस्तू महाग होत जातात आणि सर्व-सामान्य जनतेला जीवनावश्यक वस्तूंची टंचाई जाणवू लागते. त्यांच्या किंमती सतत वाढत आहेत, हे लक्षात येते. जैवविविधता आणि नैसर्गिक संपत्ती यांचा नाश होत चालला महागाईचे कारण आहे, हेही उघड होऊ लागते. आर्थिक वाढ होताना जैवविविधतेचा नाश होऊ लागतो की जनतेला निसर्गातून ज्या वस्तू मोफत उपलब्ध व्हायची सवय असते, त्याही दुर्मिळ होऊ लागतात, प्रसंगी त्याही विकत घ्याव्या लागतात. उदा. जळण आणि इमारती, चारा आणि विविध गरजांसाठी लागणारे लाकूड. या सर्वसामान्यांना लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा वाढविण्याची कोणतीही आर्थिक वाढीमध्ये तरतूद आहे, असे आढळून येत नाही. तसेच सुपीक जमीन, नद्यांची सुपीक पूरमैदाने, वने, मासेमारीचे स्रोत यांचाही आर्थिक वाढीमध्ये नाश झाल्याने त्यांच्यामुळे भागविल्या जाणाऱ्या गरजाही पैसे खर्च केल्याशिवाय भागविणे शक्य होत नाही. परिणामी सर्वसामान्य गरजांसाठी सर्वसामान्य माणूस जो निसर्गावर अवलंबून होता, त्याला आता या गरजा भागविण्यासाठी बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागते, आणि त्याच्या असे लक्षात येते की बाजारपेठ या सर्वसामान्य गरजा पुरविण्यास असमर्थ आहे. म्हणजे ज्यांना आर्थिक वाढीचा लाभ पैशाच्या स्वरूपात मिळालेला असतो, त्यांनाही सर्व-सामान्य गरजांची पूर्तता बाजारपेठेतून करता येत नाही.

# आर्थिक वाढ आणि सामाजिक न्याय व समता

## आर्थिक वाढीचा आग्रह

आर्थिक वाढीचे नारे सध्या जोरात वाजविले जात आहेत. भारताच्या आर्थिक वाढीचा दर 8 टक्क्यांवरून प्रतिवर्षी 10 किंवा 12 टक्क्यांवर पोहोचला की सर्वांचे भले होईल कारण या वाढीतला काही भाग समाजातील प्रत्येकाच्या वाटयास येऊन एकूण भारतीय समाजाची भरभराट होईल असे आज आग्रहाने सांगितले जात आहे. आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणाचा शेवट अर्थमंत्र्यांनी हाच आशावाद व्यक्त करून केला आहे. गेली 300 वर्षे अर्थशास्त्र हीच गोष्ट पुनःपुन्हा सांगत आले आहे. मात्र उत्पादन वाढीचा प्रपंच सतत करीत बसणा-या अर्थशास्त्रात या वाढीचे फायदे समाजात सर्वत्र कसे वाटले जातील आणि समाजात विषमतेला नव्हे तर समतेला हातभार कसा लागेल याचा उहापोह अगदीच त्रोटक केला जातो. त्यामागे उत्पादन वाढीमुळे सर्वांचेच कल्याण होईल आपोआप या वाढीचा फायदा समाजातील प्रत्येक घटकाला मिळेल हा आशावादच असतो.
प्रत्यक्षात हा आशावाद निष्फळ ठरतो असे सतत दिसून आले आहे. म्हणूनच चीनने यावर्षी आर्थिक वाढीचा वेग कमी करण्याचे ठरविले आहे आणि या वाढीचा फायदा समाजातील सर्व थरांना कसा मिळत राहील याकडे लक्ष देण्याचे ठरविले आहे.

## व्यस्त नाते

असे का होते? सामाजिक समता प्रत्यक्षात आणायची, विषमता कमी करायची म्हणजे आर्थिक वाढीचा दर कमी का करावा लागतो? आर्थिक वाढ आणि सामाजिक समता यांचे नाते व्यस्त का आहे?
पर्यावरणाचा विचार केला तर उत्तर सापडते की आजची आर्थिक वाढ ही निसर्गातली विविधता कमी करून केली जाते. याउलट नैसर्गिक उत्क्रांती ही विविधतेला जैविक विविधतेला पोषक ठरते. शेतीचा वाढता विस्तार हे याचे ठळक आणि उत्तम उदाहरण आहे. या अर्थाने शेती म्हणजे निसर्ग नियमाविरूद्ध जाणेच होय. आजच्या धोरणातही जैविक विविधतेला आर्थिक वाढीशी कोठेही जोडले जात नाही. आर्थिक वाढीसाठी जैवविविधता नष्ट झाली तरी हरकत नाही असेच आजचे शासकीय धोरण म्हणते. निसर्गाशी सामना करीत आर्थिक वाढ करायची म्हणजे खर्च वाढतो. निसर्गाशी सामना करण्यातच पुष्कळशी शक्ती कामी येते आणि त्यातून जे उत्पादन मिळेल त्यावर समाधान मानावे लागते. म्हणजेच जैविक विविधता कमी करून आर्थिक वाढ करणे खर्चिक ठरते.
दुसरी गोष्ट अशी की आजच्या आर्थिक वाढीमध्ये नैसर्गिक सुविधांच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष केले जाते आणि एकीकडे आर्थिक वाढ होत असताना नैसर्गिक सुविधा नष्ट होताना दृष्टीस पडतात. निसर्ग काही सुविधा आपल्याला मोफत उपलब्ध करून देत असतो याचा आधुनिक समाजाला जवळजवळ विसर पडलेला आहे असे म्हणावेसे वाटते. वातावरण आणि त्यात असलेले प्राणवायुचे प्रमाण ही निसर्गाने पुरविलेली सुविधा आहे हे आपण विसरूनच जातो. आर्थिक वाढीमुळे झालेल्या प्रदूषणामुळे हे प्रमाण कमीजास्त झाले आणि आपल्या आरोग्याला धोका होऊ लागला की या सुविधेचे महत्व समजते. नैसर्गिक हवा आणि पाण्याचे वाहते प्रवाह यांमध्ये स्वयंशुद्धी करण्याची ताकद आहे. वाहत्या पाण्याला बांध घालून ते साठवून आपण वापरतो आणि सांडपाणी नदीत सोडतो. ते नैसर्गिकरीत्या शुद्ध होणे जवळजवळ अशक्यच असते. सर्व नद्या सांडपाण्याने खराब झाल्या की स्वयंशुद्धीकरणाचे महत्व आपल्याला समजते.

## आर्थिक वाढ महाग

आर्थिक वाढीमुळे निसर्गाकडून या सुविधांचा मोफत होणारा पुरवठा बंद पडतो. मग आपल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून, बराच खर्च करून या सुविधा कृत्रिमरीत्या पुरविण्याची सोय करावी लागते. परिणामी खर्च वाढतो. आर्थिक वाढ एकदा सुरू झाली की पर्यावरणाची जी हानी होते ती कृत्रिमरीत्या मोठा खर्च करून भरून काढणे हेच तंत्रज्ञानाचे कार्य बनते. बिघडलेल्या पर्यावरणाशी कसेबसे तंत्रज्ञानाचे सहाय्याने जमवून घेणे हेच मानवी समाजाचे काम बनते.
फत्तरांचे नैसर्गिकरीत्या विघटन होऊन ठिकठिकाणी तयार झालेली माती, नदीने पुराबरोबर आणलेला गाळ, वनस्पतींनी प्रकाशसंश्लेषणाच्या सहाय्याने तयार केलेले अन्न, मधमाशीसारख्या कीटकांनी घडवून आणलेले पराग संस्करण, एवढेच नव्हे तर निसर्गातील जैवविविधता या

सर्व गोष्टी म्हणजे माणसाला मोफत पुरविलेल्या सुविधा आहेत. आपली आर्थिक वाढ अशी हवी की या मोफत सुविधांचा फायदा घेऊन उत्पादन आणि उपभोग यांत वाढ होईल. पण असे होताना दिसत नाही. आर्थिक वाढ होताना या सुविधा नष्ट होणे आणि त्या कृत्रिमरीत्या पुरविण्यासाठी खर्च करणे, हेच नेहमी अनुभविण्यास येते. त्यामुळे आर्थिक वाढ महाग पडते.

## सर्वसामान्यांच्या गरजा आणि आर्थिक वाढ

सध्या महागाईचा भस्मासूर सर्वांना भेडसावित आहे. आर्थिक वाढीची घोडदौड सुरू झाली की प्राथमिक गरजेच्या वस्तू महाग होत जातात आणि सर्वसामान्य जनतेला जीवनावश्यक वस्तूंची टंचाई जाणवू लागते. त्यांच्या किंमती सतत वाढत आहेत हे लक्षात येते. जैवविविधता आणि नैसर्गिक सुविधा यांचा नाश हेच वाढत्या महागाईचे कारण आहे हे ही उघड होऊ लागले. आर्थिक वाढ होताना जैवविविधतेचा नाश होऊ लागला की जनतेला निसर्गातून ज्या वस्तू मोफत उचलण्याची सवय असते त्याही दुर्मिळ होऊ लागतात. उदा. जळण आणि सरपण, चारा आणि विविध गोष्टींसाठी लागणारे लाकूड. या सर्वसामान्यांना लागणा-या वस्तूंचा पुरवठा वाढविण्याची कोणत्याही आर्थिक वाढीमध्ये तरतूद आहे असे आढळून येत नाही. तसेच सुपीक जमीन, नद्यांची सुपीक पूरमैदाने, वने, पाण्याचे स्त्रोत यांचाही आर्थिक वाढीमध्ये नाश झाल्याने त्यांच्यामुळे भागविल्या जाणा -या गरजाही पैसे खर्च केल्याशिवाय भागविणे शक्य होत नाही. परिणामी सर्वसामान्य गरजांसाठी सर्वसामान्य माणूस जो निसर्गावर अवलंबून होता त्याला आता या गरजा भागविण्यासाठी बाजारपेठेवर अवलंबून रहावे लागते आणि त्याच्या असे लक्षात येते की बाजारपेठ या सर्वसामान्य गरजा पुरविण्यास असमर्थ आहे. म्हणजे ज्यांना आर्थिक वाढीचा लाभ पैशाच्या स्वरूपात मिळालेला असतो अशांनाही सर्वसामान्य गरजांची पूर्तता बाजारपेठेमधून करता येत नाही.

## आर्थिक वाढीचे लाभ कोणाला?

जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे या आर्थिक वाढीत दुर्लक्ष होत असेल तर नेमके कशाचे उत्पादन वाढते आणि ते का, असे प्रश्न आपल्याला पडतील. आजच्या आर्थिक वाढीमध्ये उत्पादन कोणत्या वस्तूंचे वाढते असा प्रश्न विचारला तर असे दिसून येईल की आजची आर्थिक वाढ ही मुख्यतः बाजारपेठेच्या गरजा भागविते. बाजारपेठेत ज्या गोष्टींना मागणी त्या गोष्टींचे उत्पादन वाढविले जाते. बाजारपेठेत कोणत्या गोष्टींना मागणी असते आणि ती कोणाकडून येते असा विचार केल्यास ज्या लोकांच्या हातात क्रयशक्ती असते, पैसा हातांत खेळत असतो, अशांच्या मागण्या बाजारात नोंदविल्या जातात आणि त्या वस्तूंचे उत्पादन वाढते असे दिसून येईल. 1990 पासून बाजारपेठेवरील नियंत्रणे शिथिल केल्यावर भारतात उत्पादन कशाचे वाढले तर मोटारी, मद्य, उंची कापड, फ्रीज, एअरकंडिशनर यांसारखी विजेची उपकरणे वगैरे. सर्वसामान्यांना लागणा-या वस्तूंच्या उत्पादनास बाजारपेठेने प्राधान्य दिले नाही. कारण सर्वसामान्य माणसाच्या हातांत कयशक्ती नव्हती. याचाच अर्थ असा की आजपर्यंत जी आर्थिक वाढ झाली तिच्यामुळे सर्वसामान्यांच्या क्रयशक्तीत वाढ झाली नाही. आर्थिक वाढीमुळे निर्माण होणा-या संपत्तीचे वितरण समाजात समतेच्या तत्वानुसार झाले नाही. काही विशिष्ट वर्गाकडे संपत्ती साठत गेली आणि इतर वर्गांना आर्थिक वाढीपासून लाभ झाला नाही. म्हणूनच पंतप्रधान मनमोहन सिंग यांना अर्थसंकल्पावरील भाषणात आश्वासन द्यावे लागले की जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन वाढविण्यावर त्यांचे सरकार भर देईल. ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रामीण पायाभूत सुविधा बळकट करण्यावर तसेच खाद्यान्न, खाद्य तेल आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन वाढविण्याकडे त्यांचे सरकार लक्ष पुरवील. प्रश्न असा आहे की आर्थिक वाढीचा आजचा जो ढाचा आहे त्यामध्ये ही गोष्ट कितपत शक्य होईल? उदारीकरण, जागतिकीकरण, आर्थिक बळकटीसाठी बाजारपेठेला अधिकाधिक स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. या आग्रहावर आधारीत आर्थिक वाढीच्या ढाच्यास सर्वसामान्यांच्या गरजा पुरविण्याकडे लक्ष देणे परवडेल का? बाजारपेठेत त्यांना अग्रक्रम मिळू शकेल कां? सद्यस्थितीत ही गोष्ट शक्य दिसत नाही. बाजारपेठेवर थोडीफार नियंत्रणे लादणे तिचे स्वातंत्र्य कमी करणे किंवा आर्थिक वाढीचा ढाचाच मुळातून बदलणे या गोष्टी होतील तरच सर्वसामान्यांच्या गरजांना प्राधान्य मिळेल असे दिसते. बाजारपेठेविरूद्ध सरकार - शासन हा जुनाच संघर्ष वेगळया स्वरूपात आता जाणवू लागणार असे दिसते.

## जुनाच संघर्ष

हा संघर्ष जुनाच आहे, मूलभूत आहे, नव्हे आधुनिक अर्थशास्त्राचा जन्म होण्यासाठी तोच पुष्कळसा कारणीभूत आहे असेही म्हणता येईल. आधुनिक अर्थशास्त्राचा जनक ज्याला म्हणता येईल त्या ॲडम स्मिथनेही आपल्या 'वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथात या संघर्षालाच केंद्रीभूत मानलेले आहे आणि सरकारी नियंत्रणांच्या जाचापासून बाजारपेठ मुक्त असेल तरच मुक्त स्पर्धा तीमध्ये नांदू शकेल की ज्यामुळे ग्राहक आणि उत्पादक यांच्या स्वार्थ साधण्याच्या प्रयत्नांचेही समष्टीकरण घडून येऊन सामाजिक हित साधले जाईल असा युक्तिवाद त्याने केला आहे. त्यासाठी ग्राहकाला निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे आणि उत्पादनाची संसाधने यांवर मालकी खाजगी असली पाहिजे. त्यांच्या खरेदी विक्रीवर जाचक बंधने असता कामा नयेत असे ॲडम स्मिथ म्हणतो.

## मानवी मूल्यांची पुनर्स्थापना

आजचे बाजारपेठेचे पुरस्कर्तेही मुक्त अर्थव्यवस्थेसाठी, नियंत्रण विरहित बाजारपेठ, त्यामध्ये खुली स्पर्धा आणि त्यासाठी ग्राहकाला निवडीचे स्वातंत्र्य आणि उत्पादनाच्या संसाधनांवर खाजगी मालकी, याच गोष्टींचा आग्रह धरतात. मात्र ॲडम स्मिथने ज्या इतर गोष्टींचाही आग्रह धरला आहे, त्या गोष्टी ते सोयिस्करपणे विसरतात. निवडीचे स्वातंत्र्य असणारा ग्राहक सुशिक्षित, उच्च सामाजिक मूल्ये मानणारा आणि आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेला असावा, असेही ॲडम स्मिथने आग्रहाने सांगितलेले आहे. तसेच खुली अर्थव्यवस्था, मुक्त बाजारपेठ, खुली स्पर्धा यांच्यामुळे सामाजिक हित, संपत्तीचे योग्य वितरण साधले केव्हा जाईल? तर जेंव्हा अशी बाजारपेठ एका सुशिक्षित, उच्च नैतिक मूल्यांचे पालन करणा-या, सामाजिक जबाबदारीची खोल जाणीव असलेल्या समाजात निर्माण होईल तेव्हाच. वैयक्तिक स्वार्थाचे समष्टीकरण केवळ अशाच समाजात मुक्त बाजारपेठ आणि खुली स्पर्धा यांच्याद्वारे होऊ शकेल, यांवर ॲडम स्मिथने भर दिला.

बाजारपेठेच्या पुरस्कर्त्यांनी असा समाज आज अस्तित्वात आहे का, हा प्रश्न स्वतःला प्रथम विचारला पाहिजे. ॲडम स्मिथ नंतरच्या अडिचशे वर्षात आधुनिक अर्थशास्त्राची वहिवाट आज ज्या ज्या राष्ट्रांत चालू आहे, तिथे कोठेही असा सुसंस्कृत समाज निर्माण करण्यात मानवी समूहांना यश आलेले नाही. वैयक्तिक स्वार्थाचे समष्टीकरण त्यामुळे कोणत्याच समाजात होत नाही आणि समाजविघातक शक्तींना, विचारसरणीला बाजारपेठेवर प्रभुत्व मिळविणे सोपे जाते. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना सामाजिक न्याय प्राप्त होणे, दुरापास्तच असते. आर्थिक वाढ आणि सामाजिक न्याय, समता यांची सांगड घालणे केव्हा शक्य होईल? जेव्हा अर्थशास्त्राला, तसेच इतर शास्त्रांनाही उच्च मानवी मूल्यांची चौकट असणे, बंधनकारक मानले जाईल. म्हणजेच आजचे शिक्षण, तंत्रशिक्षण, तंत्रज्ञान, यांचा प्रसार मूलभूत मानवी मूल्यांशी जोडला जाईल. सर्वच मूल्यांविषयी साशंकता व्यक्त करण्यास उत्तेजन देणा-या आजच्या सायंटिफिक किंवा शास्त्रीय वृत्तींना हे कसे शक्य होणार? सामाजिक आणि नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यात मानवी समूह जेव्हा यशस्वी होतील, तेव्हाच आर्थिक वाढ आणि सामाजिक न्याय यांची पूर्तता एकसमयावच्छेदेकरून होऊ शकेल! अन्यथा नाही, असे म्हणावेसे वाटते.

Last words may better be expressed in English. The whole educational system should take up the responsibility of narrowing the gap between the rich and the poor. Is it possible to have the whole system work in such a way as to imbibe the values of Spartan simplicity and Athenean sensitivity and imagination? As John Ruskin has said. Is it possible to base our technical education on values indicated by ecology of technology? After all, technology is nothing but diverting the flows of energy and matter in nature towards human beings so as to benefit them exclusively. That means depriving non-human beings of flows of energy and matter. How far should we go in depriving non-human beings of energy and matter

essential to their lives? The entire technical education should be governed by a spirit of sharing the world with non-human beings.

Is it possible to have moderate profits as the goal of our management education instead of maximum profits? Is "Reverse Logistics" which aims at minimizing waste, included as a subject in our management education? Are the students given to understand that all human activities are constrained by the operation of the Laws of Thermodynamics? That, beyond a point every conversion of matter with energy results in increasing waste and escalating costs?

We need to focus our education not towards the welfare of the market but towards the welfare of the individual and the Society.

प्रकाश गोळे